

मिळकत थकबाकीदारांची वाहने जप्त करण्याचा पालिकेचा निर्णय!

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 04/05/२०25 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 96 || RNI - MAHMAR51259 || metrocity924@gmail.com


# मी सत्तेसाठी कधीच हापापलेलो नाही - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : बेरजेचे राजकारण करत करत सर्व जाती धर्माच्या घटकांना सोबत घेऊन काम करुया, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सर्वांना सामावून घेऊन काम करतो हे त्या सर्व घटकांनाही वाटले पाहिजे. सभासद नोंदणी करून राष्ट्रवादी काँग्रेस राज्यात सर्वात मोठा पक्ष उभा करुया, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका पक्षप्रवेश कार्यक्रमात केले.



जळगाव आणि धुळे जिल्ह्यातील शरद पवार गटाच्या असंख्य पदाधिकाऱ्यांनी केसी कॉलेज सभागृहात झालेल्या कार्यक्रमात जाहीर प्रवेश केला. त्यावेळी अजित पवारांनी मत मांडले.

"आम्ही राजकारणात किंवा सार्वजनिक जीवनात जात-पात, धर्म कधी पाळला नाही. अठरापगड जातींना घेऊन शिवरायांनी जसे राज्य केले. त्याचपध्दतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काम करत आहे. शिवसेना तुम्हाला चालत असेल, तर भाजपा का चालत नाही. मी सत्तेसाठी कधीच हापापलेलो नाही. सर्वाधिक सत्ता मी उपभोगली आहे.पण काहीजण सोयीनुसार कार्यकर्त्यांना विविध गोष्टी सांगत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे जेवढे आमदार होते, त्यांनी सरकारमध्ये सहभागी व्हावे असे ठरले होते. याला सर्वच आमदार साक्षीदार आहेत," अशी स्पष्ट कबुली अजितदादांनी दिली.

"लोकांचे प्रश्न सुटावे, महाराष्ट्राचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी काम करत आलो आहे. राज्यात उभारली जाणारी महापुरूषांची स्मारके भावी पिढ्यांना प्रेरणा देतील अशी कामे सरकार करत आहे. A I म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेशिवाय आता पर्याय राहिलेला नाही हे लक्षात घ्या. सर्वच क्षेत्रात हे तंत्रज्ञान वापरण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता वापराशिवाय काहीच करता येणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरातून हाताला काम मिळणार आहे," असेही त्यांनी सूचित केले.

# म्हाडा विकणार 13 हजार 395 घरे; ऑनलाइन अर्ज नोंदणी सुरु

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई :कोकण मंडळाच्या प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत विक्री न झालेल्या विविध गृहनिर्माण योजनांमधील १३ हजार ३९५ घरांच्या विक्रीसाठी नव्या वेबसाईटची निर्मिती करण्यात आली आहे. त्यावर ऑनलाइन अर्ज नोंदणीचा शुभारंभ म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आला.

कोकण मंडळाच्या विरार बोळींज, खोणी, शिरढोण, गोठेघर, भंडार्ली येथील गृहनिर्माण प्रकल्पातील विक्री न झालेली घरे उपलब्ध आहेत. मानवी हस्तक्षेपविरहित संपूर्णतः ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रणालीनुसार अर्ज नोंदणीकरण करतेवेळी आधार कार्ड, पॅनकार्डची छायांकित प्रत, स्वयंघोषणापत्र आदी बाबी ऑनलाइन वेबसाईटवर अपलोड करावयाच्या आहेत.




अर्जदाराने आवश्यक कागदपत्रे अपलोड केल्यानंतर कागदपत्रांची ऑनलाइन पडताळणी होईल. पडताळणीनंतर अर्जदाराचे प्रोफाइल तयार होईल. अर्जदाराचे प्रोफाइल तयार झाल्यानंतर अर्जदारास 'प्रथम येणाऱ्यास, प्रथम प्राधान्य' योजनेतील मंडळनिहाय उपलब्ध घरांची माहिती फ्लॅट नंबरसह मिळणार आहे. अर्जदारास या घरांमधून मजला व घर आपल्या पसंतीनुसार निवडता येणार आहे.

नव्या वेबसाईटमुळे अर्जदारास आपल्या पसंतीचे घर निवडण्याची मुभा आहे. अर्जदारांना एक डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध मिळाला आहे. ज्याद्वारे विक्रीसाठी उपलब्ध असलेली घरे अर्जदार वेबसाईटवर पाहू शकतात. त्यांच्या पात्रता व पसंतीनुसार विशिष्ट घराची निवड करू शकणार आहेत. योजना व घरांच्या सविस्तर माहितीनुसार अधिक उचित निर्णय अर्जदाराला घेण्याची संधी आहे.

- रेवती गायकर, मुख्य अधिकारी, कोकण मंडळ, म्हाडा

# पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेसाठी कर व्यावसायिकांचे मोलाचे योगदान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : "पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकार करण्यासाठी कर सल्लागार, सनदी लेखापाल यांच्यासह करदात्यांची भूमिका मोलाची आहे. योग्य करसंकलन व व्यवस्थापन, पारदर्शी अर्थव्यवस्था यासाठी आर्थिक क्षेत्रातील व्यावसायिकांनी अर्थकायद्यातील नवे बदल, कृत्रिम बुद्धिमत्ता, चॅट जीपीटीसारखे प्रगत तंत्रज्ञान व नवी कौशल्ये आत्मसात करायला हवीत," असे प्रतिपादन केंद्रीय कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या अपील प्राधिकरणाचे सदस्य सीएमए बी. एम. शर्मा यांनी केले.

महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या (एमटीपीए) वतीने आयोजित 'अमृत ज्ञानकुंभ २०२५', या दोन दिवसीय राष्ट्रीय कर परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. गणेशखिंड रस्त्यावरील कॉसमॉस टॉवरमधील सहकार भवन येथे ही दोन दिवसांची परिषद होत आहे. 'कर सल्लागार : पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभ' अशी या कर परिषदेची संकल्पना आहे. ऑल इंडिया फेडरेशन ऑफ टॅक्स प्रॅक्टिशनर्स (एआयएफटीपी), जीएसटी प्रॅक्टिशनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन (एनएमटीपीए) या संस्थांचे सहकार्य या राष्ट्रीय कर परिषदेसाठी लाभले आहे.

याप्रसंगी 'एआयएफटीपी'चे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. समीर जानी हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय कर परिषदेचे अध्यक्ष ॲड. नरेंद्र सोनवणे व 'एमटीपीए'चे अध्यक्ष ॲड. प्रसाद देशपांडे, उपाध्यक्ष श्रीपाद बेदरकर, ज्येष्ठ कर सल्लागार ॲड. निकिता बढेका, ॲड. दीपक गोडसे, ॲड. विनायक पाटकर, ॲड. नारायण जैन, ॲड. संतोष गुप्ता, ॲड. भास्कर पटेल, ॲड. नितीन गौतम, 'एमटीपीए'चे उपाध्यक्ष ॲड. अनुरुद्ध चव्हाण आदी उपस्थित होते. प्रसंगी विशेष स्मरणिकेचे, एमटीपीए टॅक्स ट्रिब्यूनचे आणि प्रकाश पटवर्धन लिखित जीएसटी (तिसरी आवृत्ती) या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. 'एआयएफटीपी'च्या नव्या संकेतस्थळाचेही अनावरण झाले. ॲड. दीपक गोडसे यांनी 'एमटीपीए'ला पाच लाखांचा धनादेश देणगी स्वरूपात सुपूर्त केला.

सीएमए बी. एम. शर्मा म्हणाले, "बदल हा प्रत्येक क्षेत्राचा स्थायीभाव असतो. बदलांना संधी मानून पुढे जाणारा आपला व्यवसाय आहे. या कर परिषदेच्या निमित्ताने ज्या विषयांवर चर्चा होणार आहे, ते सर्व विषय महत्त्वाचे आहेत. ज्ञानाचे जतन, जोपासना आणि आदानप्रदान यामुळे शक्य होत आहे. तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. त्यामध्ये क्रांतिकारी बदल होत आहेत. कायद्यांमध्ये सातत्याने सुधारणा होत आहे. या सर्व गोष्टी शिकून घ्यायला हव्यात. स्वतःला अद्ययावत ठेवणे हे गरजेचे आहे."

समीर जानी म्हणाले, "'आपल्या व्यावसायिक संस्थेचे अधिकृत सदस्यत्व स्वीकारणे तसेच संस्थेच्या नियतकालिकाचे सभासदत्व नियमित घेणे, या गोष्टींचे पालन सदस्यांनी केले पाहिजे. हे नियतकालिक करप्रणालीसंदर्भातील ताज्या घडामोडींवर, बदलांवर नियमित भाष्य करते. त्याच्या वाचनातून सदस्यांना स्वतःला सातत्याने अपडेट राहणे शक्य होते. आपल्या व्यावसायिक विश्वाशी निगडीत बदलांना सकारात्मक दृष्टीने सामोरे जा. नवे व्यावसायिक ट्रेंड्स शिकत राहा. नवे तंत्रज्ञान आत्मसात करा. युवा व्यावसायिकांमध्ये नवी कौशल्ये, नवकल्पनांचे प्रशिक्षण कसे होईल, याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे."

ॲड. नरेंद्र सोनवणे यांनी प्रास्ताविकात कर परिषदेची संकल्पना स्पष्ट केली. ज्ञान हे सत्य आणि सेवा हे कर्तव्य, या भावनेने परिषदेचे आयोजन ज्ञानाच्या आदानप्रदानासाठी केले आहे. चार महत्त्वाच्या संस्थांचे सहकार्य परिषदेसाठी लाभले आहे, असे ते म्हणाले.

प्रसाद देशपांडे, भास्कर पटेल, संतोष गुप्ता, सचिन गांधी, महेश माडखोलकर, नितीन डोंगरे, विनायक पाटकर, दीपक गोडसे, निकिता बढेका यांनीही मनोगत मांडले. प्रणव शेठ यांनी सूत्रसंचालन केले. श्रीपाद बेदरकर यांनी आभार मानले.

# मिळकत थकबाकीदारांची वाहने जप्त करण्याचा पालिकेचा निर्णय!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : मिळकतकर थकबाकीदारांच्या सदनिकेच्या भाग दाखल्यावर (शेअर सर्टिफिकेट) थकबाकी नोंदीची प्रक्रिया सुरू केली असताना आता पिंपरी-चिंचवड महापालिकेने थकबाकीदारांचा गृहनिर्माण सोसायटीतील वाहनतळ क्रमांक मागविला आहे. सोसायटीच्या अध्यक्ष, सचिवांना पत्र लिहून ही माहिती मागविली आहे. माहिती मिळताच थकबाकीदारांची वाहने जप्त करण्याचा निर्णय कर संकलन विभागाने घेतला आहे.पिंपरी-चिंचवड शहरात सहा लाख ३३ हजार ६६४ निवासी, औद्योगिक, मिश्र, मोकळ्या जमिनी, औद्योगिक अशा मिळकती आहेत. यांपैकी २०२४-२५ या आर्थिक वर्षात पाच लाख ४७ हजार ६२९ हजार, तर नव्याने नोंदणी झालेल्या ६० हजार ७२ मिळकतधारकांनी ९६६ कोटी रुपयांचा करभरणा केला, तर पाच हजारांपेक्षा अधिक रुपयांची थकबाकी असलेले एक लाख तीन हजार ६७ मिळकतधारक आहेत.त्यांच्याकडे ४५८ कोटी रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये सर्वाधिक ८२ हजार २५६ मिळकती निवासी आहेत.चालू आर्थिक वर्षाच्या देयकांबरोबरच थकबाकीदारांना मिळकती जप्त करण्याच्या नोटिसाही देण्यात येत आहेत. त्याशिवाय थकबाकीदारांच्या वाहन क्रमाकांचीही माहिती मागविण्यात येत आहे. सोसायटीचे अध्यक्ष, सचिवांनी आठ दिवसांत ई-मेल, व्हॉट्सॲपच्या माध्यमातून माहिती देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 04/05/2025

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# चिखलीत लेबर कॅम्पमधील बेकायदा दारू अड्डा उध्वस्त!..

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



चिखली येथील एका लेबर कॅम्पमध्ये देशी दारूचा अनधिकृत अड्डा चालवला जात होता. या 'लेबर कॅम्प' मध्ये तीन हजाराहून अधिक लेबर वास्तव्याला आहेत. धक्कादायक प्रकार म्हणजे या लेबर कॅम्पला लागूनच मोठी गृहनिर्माण वसाहत असून, या देशी दारूच्या अड्ड्यामुळे वारंवार वादाचे प्रसंग उद्भवले जात होते. त्यामुळे सदर दारुचा अड्डा उध्वस्त करण्यात आला.

बेकायदेशीर दारुच्या अड्ड्यामुळे स्थानिक सोसायटीधारकांनी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्याकडे तक्रार केली होती. त्या अनुशंगाने आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड पोलिसांना उचित कारवाई करण्याबाबत सूचना केली होती.

दरम्यान, पोलिसांनी तात्काळ दखल घेऊन हा दारूचा अड्डा उखडून टाकला. या कारवाईमुळे येथील सोसायटी धारकांनी अक्षरशः सुटकेचा निश्वास सोडला. चिखली येथील हॅरिझन आणि लेगसी रिव्हरसाईड सोसायट्यांच्या मागे असलेल्या बेकायदेशीर देशी दारूचा अड्डा चालवला जात होता. या मजूर कॅम्पमध्ये साधारण दोन ते तीन हजार मजूर वास्तव्याला आहेत. या दारू दुकानात वारंवार वादाचे प्रसंग उद्भवतात. मद्यधुंद अवस्थेतील हे मजूर सोसायटी धारकांसमोर अश्लील वर्तन करतात आणि अपशब्द वापरतात. अनेक वेळा त्यांनी सोसायट्यांवर दगड फेकले. यामुळे विशेषतः महिलांसाठी, लहान मुलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी असुरक्षित वातावरण निर्माण झाले असल्याची तक्रार रहिवाशांनी केली होती.

### लेबर कॅम्पमध्ये बांगलादेशी घुसखोर असण्याची शंका...

चिखलीच्या मध्यवस्तीत रहदारीच्या परिसरात असणाऱ्या या लेबर कॅम्प मधील मजुरांचे पोलीस सत्यापन आणि ओळख तपासणी करण्याची मागणी येथील नागरिकांनी केली आहे. या कॅम्पमध्ये बांगलादेशी घुसखोर असण्याची शक्यता देखील रहिवासांनी व्यक्त केली आहे आगामी काळात यांच्यामुळे परिसरातील नागरिकांना कोणत्याही प्रकारचा धोका उद्भवू नये असे देखील नागरिकांनी म्हटले आहे.

# शहरात पाणीटंचाई गंभीर,नागरिकांना तातडीने पुरेसे पाणी द्या - आ.शंकर जगताप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



चिंचवड - पिंपरी-चिंचवड शहरात सोसायट्यांना कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पुरेशा पाण्याचा तुटवडा भासत असल्याने आमदार शंकर जगताप यांनी बैठक घेत प्रशासनाला चांगलेच सुनावले. पाण्याची गळती आणि अपव्यय रोखून नागरिकांना त्वरित समाधानकारक पाणीपुरवठा करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक सोसायट्यांना सध्या निर्धारित कोट्यापेक्षा कमी पाणी मिळत असून, नागरिकांना टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. कडक उन्हाळ्यात पाण्याच्या या संकटामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार शंकर जगताप यांनी चिंचवडगावात पाण्याच्या टाकी खाली महत्त्वपूर्ण बैठक घेतली.

या बैठकीत जगताप यांनी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सुनावले. पाण्याची गळती, गैरवापर व अपव्ययाबाबत त्यांनी नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना राबवण्याचे आदेश दिले. व्यावसायिक वापराच्या तुलनेत पिण्याच्या पाण्याला पूर्ण प्राधान्य देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

"पिण्याचे पाणी हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिक आणि सोसायटीला नियमानुसार व पुरेसे पाणी मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशासनाने तातडीने कामाला लागावे," असे स्पष्ट निर्देश आमदार जगताप यांनी दिले.

बैठकीस भाजपा जिल्हा सरचिटणीस नामदेव ढाके, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, माजी नगरसेवक सुरेश भोईर, माजी नगरसेविका अश्विनी चिंचवडे, माधुरी कुलकर्णी, माजी स्वीकृत नगरसेवक बिभीषण चौधरी, विठ्ठल भोईर, भाजपा उपाध्यक्ष शेखर चिंचवडे तसेच इतर स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशासनातर्फे पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता दीपक पाटील, उपअभियंते चंद्रकांत मोरे व देसाई, कनिष्ठ अभियंता साकेत पावरा तसेच रघुनाथ शेमले, राहुल पाटील, सागर पाटील, संदीप ढेपले, शरद मोरे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत नागरिकांचे प्रश्न गांभीर्याने घेत तातडीने त्यावर कारवाई करण्याचे आश्वासनही अधिकाऱ्यांनी दिले. यामुळे नागरिकांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# विवाहाचे आमिष दाखवून विधवेवर अत्याचार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : अपघातात मयत झालेल्या जवानाच्या पत्नीला विवाहाचे आमिष दाखवून वारंवार अत्याचार करीत तिच्या नावे असलेले ३१ लाख १७ हजार रुपये उकळणाऱ्या इसमावर आळेफाटा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेश लहानू काकड (रा. बोटा, ता. संगमनेर, जि. अहमदनगर) याच्यासह लहानू काकड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत २९ वर्षीय महिलेने आळेफाटा पोलिस ठाण्यात बलात्कार आणि आर्थिक फसवणुकीची फिर्याद दिली आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहिताच्या बीएनएस २०२३ अन्वये कलम ६५ (२) (एम), ७५ (१) (ii), ७५ (१) (iii), 308 (1), 308 (2) द्वारे गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतीय सैन्यात असलेल्या जवानाचे ड्यूटीवर हजर होत असताना २६ ऑक्टोबर २०१५ रोजी अपघातात निधन झाले. ३१ लाख रुपयेही घेतले काढून पतीच्या आर्मी इन्शुरन्सचे ३२ लाख रुपये तिला मिळाले होते. ऑक्टोबर २०१७ पासून आळेफाटा येथील एका हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून महिला कार्यरत होती. १७डिसेंबर २०१७ ते दि. ८ एप्रिल २०२५ या कालवधीत गणेश लहानू काकड याने तिच्याशी ओळख व जवळीकता साधून विश्वास संपादन केला. लग्न करण्याचे वचन देऊन आळेफाटा तळेगाव, ओझर येथे लॉजवर नेऊन जबरदस्तीने शरीरसंबंध करून अश्लील व्हिडीओ काढून ते व्हायरल करण्याची धमकी दिली. तिच्या इच्छेविरुद्ध शरीरसंबंध केले, तसेच वारंवार फोन करून लॉजवर बोलवून तिला मानसिक त्रास दिला, तसेच पतीचे इन्सुरन्सचे मिळालेले ३१ लाख १७ हजार ४१६ रुपये बँक अकाउंटवरून काढून घेतले. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# मोहननगर येथे सहा दिवसीय शिव - फुले - शाहू - आंबेडकर- लोकमान्य व्याख्यानमालेची वैचारिक मेजवानी.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी जय भवानी तरुण मंडळ आयोजित सहा दिवसीय शिव - शाहू - फुले - आंबेडकर - लोकमान्य व्याख्यानमालेचा प्रारंभ बुधवार, दिनांक ०७ मे २०२५ पासून होत असून दररोज सायंकाळी सात वाजता व्याख्यानाची सुरुवात होईल. व्याख्यानमाला वीसपेक्षा जास्त वर्षे जुनी असून नेहमीप्रमाणे राज्यातील विचारवंतांच्या विविध विषयांच्या वरील विचार मंथनातून वैचारिक मेजवानी मिळणार आहे. श्री दत्त मंदिर चौक, मोहननगर, चिंचवड येथे होणाऱ्या या व्याख्यानमालेत बुधवार, दिनांक ०७ मे रोजी ज्येष्ठ विचारवंत डॉ. विश्वंभर चौधरी 'राष्ट्रपिता महात्मा गांधी : सत्य - अहिंसेचे पुजारी!' या विषयावर विचार मांडून पहिल्या पुष्पाची गुंफण करतील. गुरुवार, दिनांक ०८ मे रोजी सुप्रसिद्ध अभिनेते किरण माने 'शिवराय ते भीमराय!' या विषयावर दुसरे पुष्प गुंफतील. शुक्रवार, दिनांक ०९ मे रोजी सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे पाटील 'छत्रपती संभाजीमहाराज... धगधगती अंगारगाथा!' या विषयावर तिसऱ्या पुष्पाची गुंफण करतील. शनिवार, दिनांक १० मे रोजी ज्येष्ठ विचारवंत अशोक वानखेडे (टायगर) 'शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर, भारतीय संविधान : भारताची दशा आणि दिशा! (नेहरू ते मोदी)' या विषयावर चौथे पुष्प गुंफतील. रविवार, दिनांक ११ मे रोजी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. हेमंत देसाई 'महाराष्ट्राची दशा आणि दिशा! (यशवंतराव ते देवेंद्र)' या विषयावरील पाचवे पुष्प गुंफतील.

व्याख्यानमालेतील अंतिम पुष्प सोमवार, दिनांक १२ मे रोजी भारुडसम्राट ह. भ. प. लक्ष्मण महाराज राजगुरू 'अरे अरे माणसा तू कधी होशील रे माणूस? जगण्याचे अंतिम सत्य!' या विषयाच्या माध्यमातून गुंफतील. निःशुल्क असलेल्या या व्याख्यानमालेचा लाभ सर्व नागरिकांनी आवर्जून घ्यावा, असे आवाहन जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि मुख्य संयोजक मारुती भापकर तसेच पिंपरी - चिंचवड व्याख्यानमाला समन्वय समिती कार्यवाह राजेंद्र घावटे यांनी केले आहे.




बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968